# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

**परिपत्रक क्रमांक : 20 /२०२५**

**विषय:-** **शासकीय कर्मचाऱ्याच्या / निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्युनंतर अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास किंवा चोवीस वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर आयुष्यभरासाठी किंवा तिचा विवाह होईपर्यंत किंवा पुनर्विवाह होईपर्यंत किंवा तिने उपजिविकेस सुरुवात करीपर्यंत कुटुंबनिवृत्ती वेतन सुरु करणेबाबत...**

**संदर्भ :- १.महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार - अ, अधिसूचना, वित्त विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२४**
**२.महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६४/ सेवा-४, दि.०७ जानेवारी, २०२५**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर सेवक व सेवानिवृत्त सेवक यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय अधिसूचनेनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम ११६ मधील, पोट-नियम (५) मध्ये (अ) खंड (तीन) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येत आहे, अशी खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे :-

शासकीय कर्मचाऱ्याच्या / निवृत्तीवेतनधारकाच्या मृत्युनंतर अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरिकदृष्टया पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास किंवा चोवीस वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर आयुष्यभरासाठी किंवा तिचा विवाह होईपर्यंत किंवा पुनर्विवाह होईपर्यंत किंवा तिने उपजिविकेस सुरुवात करीपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियमांच्या अधिन राहुन कुटुंब निवृत्तीवेतन मंजूर करण्यात येईल किंवा नियमितपणे प्रदेय राहील.

सदर परिपत्रकासोबत जोडलेल्या महाराष्ट्र शासन राजपत्राचा व वित्त विभागाचा शासन निर्णयाचा अभ्यास करुन पात्र सेवकांनी लेखी स्वरुपात अर्ज शिक्षक कर्मचाऱ्यांनी प्रशासन शिक्षक कक्ष व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रशासन शिक्षकेत्तर कक्षाकडे संबंधित आवश्यक कागदपत्रांच्या पुराव्यानिशी प्रत्येकी २ मूळ प्रतीत जमा करावा.

**सोबत :-**
१.महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार - अ, अधिसूचना, वित्त विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दि. ०८.०२.२०२४
२.महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६४/ सेवा-४, दि.०७.०१.२०२५

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७
जावक क्र. एएन/ 410
दिनांक : 28 JAN 2025

डॉ. चारुशिला आर गायके
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व संचालक, प्रशाला
३. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.

C:\Users\comp-6\Documents\Admin Document\circular.doc

RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष १०, अंक ३] गुरुवार ते बुधवार, फेब्रुवारी १५-२१, २०२४/माघ २६-फाल्गुन २, शके १९४५ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ८ फेब्रुवारी २०२४.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेनिवे-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-४.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ ला सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम, २०२४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ याच्या नियम ११६ मधील, पोट-नियम (५) मध्ये,—

(अ) खंड (तीन) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(तीन) अविवाहित मुलीच्या बाबतीत (मानसिक किंवा शारीरिक विकलांगता असलेल्या मुलीव्यतिरिक्त), ती चोवीस वर्षे वयाची होईपर्यंत किंवा तिचा विवाह होईपर्यंत, यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत अथवा विधवा किंवा घटस्फोटित असलेल्या व ती स्वतःची उपजिविका करत नाही अशा मुलीच्या बाबतीत;";

(ब) परंतुकामध्ये परिच्छेद (पाच) नंतर, पुढील परिच्छेद जादा दाखल करण्यात येईल :—

"(सहा) शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या आणि त्याच्या किंवा तिच्या जोडीदाराच्या मृत्युपूर्वीच अस्तित्वात असलेली विकलांगता;

(सात) जेव्हा मयत शासकीय कर्मचारी किंवा निवृत्तिवेतनधारक त्याच्या पश्चात खंड (एक) किंवा खंड (दोन) किंवा खंड (तीन) अन्वये कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्यास पात्र असलेली विधवा किंवा विधुर किंवा मुलगा किंवा मुलगी

नसेल त्याबाबतीत अथवा जर, खंड (एक) किंवा खंड (दोन) किंवा खंड (तीन) अन्वये कुटुंब निवृत्तिवेतनासाठी पात्र असलेली विधवा किंवा विधुर किंवा मुलगा किंवा मुलगी मृत पावली असेल किंवा त्या खंडामध्ये विहित केलेल्या कुटुंब निवृत्तिवेतनास पात्र राहणार नसेल तर, अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटित मुलीला, चोवीस वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर आयुष्यभरासाठी किंवा तिचा विवाह होईपर्यंत किंवा पुनर्विवाह होईपर्यंत किंवा तिने उपजिविकेस सुरुवात करीपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, पुढील शर्तींच्या अधीन राहून, कुटुंब निवृत्तिवेतन, मंजूर करण्यात येईल किंवा नियमितपणे प्रदेय होईल :—

(ए) शेवटचे अपत्य विहित वयाचे होईपर्यंत, परिच्छेद (दोन) ते (चार) मध्ये निर्धारित केलेल्या क्रमानुसार अपत्यांना प्रथम कुटुंब निवृत्तिवेतन प्रदेय असेल;

(बी) परिच्छेद (एक) आणि (दोन) ला अनुसरुन, कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्यासाठी विकलांगता असलेले पात्र अपत्य;

(सी) अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटित मुलगी जेव्हा, तो किंवा ती किंवा ते हयात होते तेव्हा, तिच्या पालकावर किंवा पालकांवर अवलंबून होती;

(डी) जेव्हा मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या मागे चोवीस वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या एकपेक्षा जास्त अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटित मुली असतील तेव्हा, जी मुलगी, त्याच्या जन्मक्रमानुसार या पोट-नियमान्वये कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्याच्या पात्रतेच्या अटी पूर्ण करील अशा मुलीला, प्रथम कुटुंब निवृत्तिवेतन प्रदेय होईल;

(इ) सर्वात मोठी मुलगी, तिचा विवाह होईपर्यंत किंवा पुनर्विवाह होईपर्यंत किंवा ती उपजिविकेस सुरुवात करीपर्यंत, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत, कुटुंब निवृत्तिवेतनास हक्कदार असेल आणि सर्वात धाकटी मुलगी, तिच्यापेक्षा मोठ्या असलेल्या मुलीचा विवाह झाल्यानंतर किंवा पुनर्विवाह झाल्यानंतर किंवा तिच्या उपजिविकेस सुरुवात केल्यानंतर किंवा मृत झाल्यानंतर, कुटुंब निवृत्तिवेतनास पात्र होईल;

(एफ) विधवा मुलीच्या बाबतीत, तिच्या पतीचा मृत्यु किंवा घटस्फोटित मुलीच्या बाबतीत, शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या किंवा त्याच्या किंवा तिच्या जोडीदाराच्या हयातीत घटस्फोट झाल्यास :

परंतु, जर घटस्फोटाची कार्यवाही, शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या किंवा त्याच्या किंवा तिच्या जोडीदाराच्या हयातीत सक्षम न्यायालयात दाखल केली असेल, परंतु, त्यांच्या मृत्युनंतर घटस्फोट झाला असेल तर, घटस्फोटित मुलीला, घटस्फोटाच्या दिनांकापासून कुटुंब निवृत्तिवेतन प्रदेय राहील :

परंतु आणखी असे की, जर शासकीय कर्मचाऱ्याचा किंवा निवृत्तिवेतनधारकाचा आणि त्याच्या किंवा तिच्या जोडीदाराचा मृत्यू झाल्यानंतर, मुलीच्या घटस्फोटाच्या दिनांकापूर्वी कुटुंबातील इतर कोणत्याही पात्र सदस्यास कुटुंब निवृत्तिवेतन प्रदेय झाले असेल तर, कुटुंबातील पूर्वोक्त सदस्य कुटुंब निवृत्तिवेतनाकरिता पात्र असल्याचे बंद किंवा मयत होण्यापूर्वी, अशा घटस्फोटित मुलीला कुटुंब निवृत्तिवेतन सुरु केले जाणार नाही.";

(क) स्पष्टीकरणातील, परिच्छेद (बी) मध्ये, "मुलीचा ज्या तारखेस विवाह होईल" या मजकुराअगोदर, "मानसिक किंवा शारीरिक विकलांगता असलेल्या मुलीखेरीज," हा मजकूर दाखल करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनिषा यु. कामटे,**
शासनाचे उप सचिव.

४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४०० ००४.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५४) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
५५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
५६) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५९) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६०) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
६१) निवड नस्ती.

५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
९) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१५) राज्यपालांचे सचिव.
१६) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३०) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग.
३३) सर्व विभागीय आयुक्त.
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.
४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.
४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठे, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.

शासकीय कर्मचाऱ्याच्या / निवृत्तिवेतनधारकाच्या मृत्युनंतर अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलीला व मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारीरिकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास कुटुंब निवृत्तिवेतन प्रदान करणेबाबत मार्गदर्शक सूचना

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.६४/सेवा-४**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०७.०१.२०२५.

संदर्भ : १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.८३/कोषा प्रशा-५, दि.३०.१२.२०१५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५०/सेवा-४, दि.०८.१०.२०१८.
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१९/प्र.क्र.२०८/सेवा-४, दि.०७.०५.२०१९.
४) शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांक : सेनिवे-२०१८/प्र.क्र.४४/सेवा-४, दि.०८.०२.२०२४.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ मधील नियम ११६ अन्वये कुटुंब निवृत्तिवेतनाबाबत तरतूदी नमूद करण्यात आलेल्या आहेत. सध्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार शासकीय कर्मचाऱ्याच्या व त्याच्या प्रथम वारस (पती / पत्नी) यांच्या मृत्युनंतर अविवाहित मुलीच्याबाबतीत ती २४ वर्षे वयाची होईपर्यंत अथवा तिचा विवाह होईपर्यंत यापैकी जी घटना अगोदर घडेल तोपर्यंत तिला कुटुंब निवृत्तिवेतन प्रदान करण्यात येते. तसेच मानसिक अथवा शारिरीक विकलांगता असलेल्या पाल्याला हयातभर कुटुंब निवृत्तिवेतन मिळण्याची तरतूद आहे.

शासकीय कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते हयात असताना त्यांची मुलगी अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा असेल व अशी मुलगी स्वत:चा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असेल तर अशा प्रकरणी केंद्र शासनाने शासकीय कर्मचाऱ्याच्या व त्याच्या प्रथम वारस (पती / पत्नी) यांच्या मृत्युनंतर कुटुंब निवृत्तिवेतन प्रदान करणेबाबत निवृत्तिवेतनाबाबत सुधारणा केलेली आहे. (कार्यालयीन ज्ञापन दि.३०.०८.२००४ व तद्नंतर वेळोवेळी केलेल्या सुधारणा)

केंद्र शासनाने केलेल्या सुधारणेच्या अनुषंगाने अशा प्रकरणी महाराष्ट्र राज्य शासनाच्या कुटुंब निवृत्तिवेतन प्रदान करण्याच्या कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

अविवाहित, घटस्फोटित किंवा विधवा मुलीच्या बाबतीत मुलीला २४ वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर हयातभर, तिचा विवाह / पुनर्विवाह होईपर्यंत किंवा तिने उपजिविकेची सुरुवात करेपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पुढील अटींच्या अधिन राहून कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल.

(१) शासकीय कर्मचारी ज्यावेळी सेवानिवृत्त होईल त्यावेळी त्याच्या मूळ निवृत्तिवेतन प्रकरणामध्ये त्याच्या अन्य पात्र कुटुंब निवृत्तिवेतनधारक, वारसदारांसह प्रदान आदेशामध्ये त्याच्या अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा मुलीच्या नावाचा समावेश करण्यात यावा. कार्यालय प्रमुखाने शासकीय कर्मचाऱ्याचे निवृत्तिवेतनाचे प्रकरण तयार करतानाच नमुना ३ मध्ये कुटुंबाचा तपशील, अपत्याचा जन्म दाखला तसेच इतर आवश्यक कागदपत्रांसह निवृत्तिवेतन प्रकरण महालेखापाल कार्यालयाकडे मंजुरीकरीता पाठवावे.

(२) विधवा मुलीच्या बाबतीत, तिच्या पत्तीचा मृत्यू आणि घटस्फोटीत मुलीच्या बाबतीत कायदेशीर घटस्फोट, शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या किंवा त्याच्या किंवा तिच्या जोडीदाराच्या हयातीत झाला असणे आवश्यक आहे. तसेच घटस्फोटाची कार्यवाही, शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या हयातीत सक्षम न्यायालयात दाखल केली असेल, परंतु त्यांच्या मृत्यूनंतर घटस्फोट झाला असेल तर, घटस्फोटीत मुलीला, घटस्फोटाच्या दिनांकापासून कुटुंब निवृत्तिवेतन प्रदेय ठरेल.

(३) जे निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई जिल्हा कोषागार कार्यालयातून निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतन घेत होते आणि मृत झालेले आहेत, त्यांच्या अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलीस कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय होण्यासाठी निवृत्तिवेतनधारक ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त किंवा मृत झालेले आहेत त्या कार्यालयामार्फत कुटुंब निवृत्तिवेतनाचा प्रस्ताव नमुना १२ मध्ये तपशील भरून निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाचे मृत्यू प्रमाणपत्र, इतर भावंडांचे ना-हरकत प्रमाणपत्र आणि कुटुंब निवृत्तिवेतन देय असलेल्या मुलीचे आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक पासबूकचे प्रथम पृष्ठ, शिधापत्रिका इत्यादीच्या सांक्षाकित केलेल्या छायांकित प्रतीसह कुटुंब निवृत्तिवेतन प्रकरण मंजूरीकरीता महालेखापाल कार्यालयाकडे पाठविण्यात यावे. सदर प्रकरण अर्जदाराने परिपूर्ण अर्ज व अन्य सहपत्रे सादर केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या १५ दिवसांच्या आत महालेखापाल कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी संबंधित कार्यालय प्रमुखाची राहील.

(४) महालेखापाल कार्यालयाने मृत झालेल्या निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांचे निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) ची मागणी संबंधित अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई अथवा जिल्हा कोषागार कार्यालय यांच्याकडे करावी. अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई व जिल्हा कोषागार कार्यालय यांनी त्यांच्याकडील निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) अंतिम निवृत्तिवेतन प्रमाणपत्र नोंदवून महालेखापाल कार्यालयास परत करावे. महालेखापाल कार्यालयाने जुने निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) रद्द करून सुधारित निवृत्तिवेतन प्रदान आदेश (PPO) मंजूर करण्याची कार्यवाही करावी.

(५) शासकीय कर्मचाऱ्याच्या दोन किंवा अधिक अपत्यांपैकी एक असेल तर शेवटचे अज्ञान अपत्य यथास्थिती २१ किंवा २४ वर्षे वयाचे होईपर्यंत कुटुंब निवृत्तिवेतन प्रथमतः अज्ञान अपत्यांना प्रदान होईल आणि त्यानंतर

कुटुंब निवृत्तिवेतन मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरीकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता आणि अविवाहित किंवा विधवा किवा घटस्फोटीत मुलगी अशी दोनही अपत्ये असतील तर मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरीकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता असलेल्या अपत्यास प्रथम कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल. जेव्हा मोठे असलेले अपत्य अपात्र होईल, त्यानंतर त्याच्या पुढील लहान अपत्यास कुटुंब निवृत्तिवेतन देय ठरेल.

(६) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या मागे मानसिक दुर्बलता असलेली किंवा शारिरीकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता असलेली एकापेक्षा जास्त अपत्ये असतील अशा प्रकरणी त्यांच्या जन्मक्रमानुसार कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल.

(७) मृत शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या मागे २४ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या एकापेक्षा जास्त अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुली असतील अशा प्रकरणी त्यांच्या जन्मक्रमानुसार कुटुंब निवृत्तिवेतन मंजूर करण्यात येईल.

(८) शासकीय कर्मचाऱ्याच्या किंवा निवृत्तिवेतनधारकाच्या / कुटुंब निवृत्तिवेतनधारकाच्या हयातीत / मृत्यूपूर्वीच अपत्यास मनोविकृती किवा मानसिक दुर्बलता किंवा शारिरीकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता अस्तित्वात असणे आवश्यक आहे.

(९) शासकीय कर्मचारी, निवृत्तिवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तिवेतनधारक हयात असताना अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलगी तिच्या पालकावर किंवा पालकांवर अवलंबून असणे आवश्यक असून शासकीय कर्मचारी, निवृत्तिवेतनधारक किंवा कुटुंब निवृत्तिवेतनधारक हयात असताना त्यांच्यावर अवलंबून असल्याबाबतचे समुचित मुद्रांक पत्रावर साक्षांकित (Notarised) केलेले मूळ स्व-घोषणापत्र, संबंधित मुलीचे वास्तव्य असलेल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी /तहसिलदार कार्यालयातील सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले सर्व मार्गांनी मिळणारे एकूण कौटुंबिक मासिक उत्पन्न (रु.७५००+ प्रचलित महागाई मता) यापेक्षा जास्त नसल्याचा उत्पन्नाचा दाखला निवृत्तिवेतन प्रकरण मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेल्या इत्तर नमुन्यांसोबत कुटुंब निवृत्तिवेतन प्रकरण सादर करताना देणे आवश्यक आहे.

(१०) महालेखापाल कार्यालयाकडून निवृत्तिवेतन प्रकरण मंजूर झाल्यानंतर व कुटुंब निवृत्तिवेतन प्रदान सुरू झाल्यानंतर या प्रकरणी जिल्हाधिकारी / तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला, हयातीचा दाखल प्रतिवर्षी माहे नोव्हेंबर अखेर तसेच पुनर्विवाह न केल्याबाबतचे व उपजिविकेची सुरुवात न केल्याबाबतचे स्व-घोषणापत्र प्रतिमाह अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे

(११) अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलीने पुनर्विवाह केल्यास किंवा तिने उपजिविकेची सुरुवात केल्यास याबाबत तिने स्वतः कुटुंब निवृत्तिवेतन घेत असलेल्या संबंधित जिल्हा कोषागार कार्यालय / उपकोषागार कार्यालयास तात्काळ कळविणे आवश्यक आहे.

(१२) ज्या कुटुंब निवृत्तिवेतनधारक अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलीला अधिसूचनेच्या दिनांकापासून म्हणजे दि.०८.०२.२०२४ पासून कुटुंब निवृत्तिवेतन अनुज्ञेय राहील. तथापि त्यांना दि.०८.०२.२०२४ पूर्वीची थकबाकी अनुज्ञेय राहणार नाही. त्यांना दि.०८.०२.२०२४ ते कुटुंब निवृत्तिवेतन प्रत्यक्ष अदा करे पर्यंतच्या कालावधीची थकबाकी अनुज्ञेय राहील.

(१३) कोषागार कार्यालयाने कुटुंब निवृत्तिवेतनाच्या अनुषंगाने निवृत्तिवेतनधारकाच्या ओळख तपासणीबाबतच्या तरतूदी संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयानुसार राहतील.

(१४) मनोविकृती किंवा मानसिक दुर्बलता असलेल्या किंवा शारिरीकदृष्ट्या पांगळेपण किंवा विकलांगता आलेल्या अपत्यास अथवा अविवाहित किंवा विधवा किंवा घटस्फोटीत मुलगी म्हणून कुटुंब निवृत्तिवेतन घेणाऱ्या कुटुंब निवृत्तिवेतनधारकांची माहिती निवृत्तिवेतनवाहिनी प्रणालीत संकलीत करण्यात यावी. यासाठी संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी निवृत्तीवेतनवाहिनी प्रणालीत समूचित सुविधा विकसित करून घ्यावी.

२. जिल्हा परिषदा, मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय प्राथमिक व माध्यमिक शाळा, कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित मान्यता प्राप्त व अनुदानित अशासकीय विद्यालये तसेच कृषि विद्यापीठे व तत्सम अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना वरील परिपत्रक योग्य त्या फेरफारांसह लागू राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२५०१०७१५३५०६८००५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=a7f08db3910ecf0f88c442fbde20f7b84e70dfd0bf4dcd977abab75b3fcb8508, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2025.01.07 15:37:49 +05'30'

**(मनिषा यु.कामटे)**
**शासनाचे उप सचिव.**

**प्रति,**

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.